दि. १३ जानेवारी २०२२

# सरस्वती भुवन शिक्षण संस्था

# स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा - २०२२

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२ या काळात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.'मराठी भाषा जोपासना व संवर्धन' हा सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा एक मूलभूत उददेश आहे. १९१५ साली स्थापन झालेली ही संस्था व्यावहारिक क्षेत्रात व ज्ञानक्षेत्रात मातृभाषेचा सातत्यपूर्ण व अचूक वापर व्हावा यासाठी दक्ष राहात आलेली आहे. मराठवाडा प्रदेशाच्या विकासाशी नाते सांगणारी ही संस्था ज्ञानक्षेत्रातल्या आपल्या निष्ठा सातत्याने जोपासत आलेली आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाच्या निमित्ताने **संस्थेचे स.भु.कला व वाणिज्य महाविद्यालय** दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून मराठवाडा पातळीवर व्याख्याने,कार्यशाळा व विविध उपक्रमांचे आयोजन करीत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

## स.भु.कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे आयोजित कार्यक्रम

१. **मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे उद्घाटन व कार्यशाळा –सोमवार,दि. १७ जानेवारी, २०२२.**

पंधरवड्याच्या उद्घाटन प्रसंगी **'प्रमाण लेखन व कार्यालयीन लेखनविषयक कार्यशाळा'**आयोजित करण्यात आलेली आहे. या कार्यशाळेमध्ये मा.उपजिल्हाधिकारी श्रीमती अंजली धानोरकर या 'कार्यालयीन लेखना' विषयी आणि महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्राध्यापक डॉ.नागेश अंकुश हे

'प्रमाण लेखना'विषयी मार्गदर्शन करणार आहेत. सोमवार दिनांक १७ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत ही कार्यशाळा आयोजित केलेली आहे.

२. **व्याख्यान : 'स्वातंत्र्यपर मराठी कविता' -प्रा.डॉ.संतोष पवार- शुक्रवार दि. २१ जानेवारी, २०२२**

प्रा.डॉ.संतोष पवार, रयत शिक्षण संस्थेचे आर.बी. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि. अहमदनगर

**३. आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक यांच्या करिता आयोजित केलेले उपक्रम**

- **स्पर्धा**

**१. पत्रलेखन स्पर्धा**

**अ) मातृभाषेस पत्र      आ) आवडत्या लेखकास पत्र**

- कोणत्याही एका विषयावर एक दीर्घ व आशयसंपन्न पत्र लिहिणे अपेक्षित आहे.
- या उपक्रमातील प्रथम तीन क्रमांकांच्या पत्रांना योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल.

२. **पृष्ठ संकेतपट्टी स्पर्धा** ( बुकमार्क तयार करणे )

- या स्पर्धेअंतर्गत संगणकीय आधाराने तयार केलेली व प्रत्यक्ष तयार करून छायाचित्र स्वरूपात पाठवलेली 'पृष्ठ संकेतपट्टी' या दोन्ही प्रकारातून प्रत्येकी तीन क्रमांक काढले जातील.

- या पृष्ठ संकेतपट्टीवरच खालच्या बाजूला स्पर्धकाने आपले नाव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला असावा.

**३. साहित्यिक शब्दकोडे स्पर्धा**

•लेखन उपक्रम

१. मराठी साहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्वातंत्र्याच्या जाणिवा

२. मराठी साहित्याची संकेतस्थळे

३. ई - साहित्याचा समाजावरील प्रभाव

४. मराठी साहित्यातून व्यक्त झालेल्या पर्यावरणीय जाणिवा

५. साहित्याने व्यक्त केलेले सामाजिक व राष्ट्रीय प्रश्न

६. वाचन संस्कृतीच्या विविध घटकांचे स्वरूप व योगदान

७. मराठवाडा प्रदेशातील प्रकाशन संस्था

८. मराठी संस्कृतीचे प्रादेशिक विशेष (मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण)

९. मातृभाषेची विश्वाला गवसणी

१०. बहुभाषिकता काळाची गरज

११. मातृभाषेवरील प्रभुत्व - बहुभाषिकतेचे द्वार

१२.मराठी साहित्यात दिले जाणारे विविध पुरस्कार

१३. वाचनीय पुस्तकांचा परिचय

१४. मराठी भाषा संवर्धनात माझी भूमिका

१५. मराठी संगीत नाटक

१६. मराठी साहित्य व इतर ज्ञानशाखा यांचा परस्पर संबंध

१७. मराठी भाषेतील नाट्यपरंपरा

१८. मराठी भाषेतील बोधकथा

१९ . मराठी चित्रपटांच्या वाटा आणि वळणे

२० . साहित्याचे माध्यमांतर / माध्यमांतरित साहित्य

( उदा : अ)नटसम्राट नाटकाचे चित्रपट रूपांतर

आ) नटरंग : कादंबरी व चित्रपट

इ)सिंहासन : कादंबरी व चित्रपटातील राजकीय विश्व )

२१. दृक - श्राव्य माध्यमांचे मराठी साहित्यातील योगदान

२२. माझी लेखन प्रेरणा

२३. वाचन संस्कृती

- या ठिकाणी विविध विषयांची स्थूल रूपरेखा दिलेली आहे. संबंधित विषयाचे विशिष्ट पैलू निवडून आपण लेखन करावे.
- हे व यासारखे इतर विषय घेऊन आपले लेखन ८०० ते १००० या शब्दमर्यादेत पाठवावे.
- आपले हे लेखन sbacmar1963@gmail.com या ई-मेल आयडी वर दिनांक २६ जानेवारी २०२२ पर्यन्त पाठवावे.

**आपण हे साहित्य**

१. हस्तलिखिताचे छायाचित्र (फोटो) काढून jpeg स्वरूपात पाठवू शकता. हस्तलिखिताचे छायाचित्र सुस्पष्ट, वाचनीय असावे याची दक्षता घ्यावी.

२. युनिकोडमध्ये (गूगल मराठी) टंकलिखित स्वरूपात वर्ड व पीडीएफ फाईल पाठवू शकता.

[ टंक-आकार  (फॉन्टसाईझ) शीर्षक - १४ , मजकूर -१२ ]

{ वरील निवडक साहित्य जतन करून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले जाईल }

**४. मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचा समारोप व व्याख्यान -प्रा.डॉ.सतीश बडवे, दिनांक २८ जानेवारी, २०२२**

या पंधरवडयाचा समारोप ज्येष्ठ व व्यासंगी अभ्यासक, निवृत्त प्राध्यापक डॉ.सतीश बडवे यांच्या व्याख्यानाने होणार आहे. **'साहित्याचे अध्ययन व अध्यापन'** या विषयावर ते विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक यांना मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमाचे आयोजन दूरदृश्य प्रणालीद्वारे मराठवाडा पातळीवर केले जाईल.

आभासी पदधतीने होणा-या या सर्व कार्यक्रमांचा लाभ विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व भाषाप्रेमींनी घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मा. राम भोगले, उपाध्यक्ष ॲड. दिनेश वकील, उपाध्यक्ष डॉ. रमेश गुमास्ते सरचिटणीस डॉ. नंदकुमार उकडगावकर, कोषाध्यक्ष श्री. अरुण मेढेकर,सभापती श्री ओमप्रकाश राठी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.मकरंद पैठणकर, उपप्राचार्य डॉ.माधव गायकवाड,उपप्राचार्य डॉ.प्रमोद देव, उपप्राचार्य संजय गायकवाड, मराठी विभागप्रमुख डॉ.ऋषीकेश कांबळे, प्रा.डॉ.वृंदा देशपांडे, प्रा. डॉ. नागेश अंकुश, प्रा. शाहू पाटील यांनी केलेले आहे. इच्छुकांनी http://www.sbaccollege.in या संकेतस्थळाला किंवा https://www.facebook.com/sbescollegeofartscomm/ या फेसबूक पेजला भेट देऊन आपला सहभाग निश्चित करावा.

प्रभारी प्राचार्य

डॉ. मकरंद पैठणकर